कौशल्य, रोजगार, उद्योजकता
नाविन्यता विभाग
महाराष्ट्र शासन

iti

# प्रवेश मार्गदर्शिका

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती**



**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
3, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक 10036, मुंबई 400 001
https://admission.dvet.gov.in/ | www.facebook.com/dvetms/ | DVET E-Learning

## संचालकांचे मनोगत

राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रणाली उपलब्ध करुन देतांना मनस्वी आनंद होत आहे.

शालांत परीक्षा उत्तीर्ण होऊन आपल्या भवितव्याची स्वप्ने पाहणारी ही पिढी जागतिकीकरणानंतर जन्मली आहे. जागतिकीकरण आणि संगणकीकरणामुळे तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे व मानवी व्यवहारातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. हे बदल आत्मसात करुन भविष्यातील तांत्रिक बदलांना अनुकुल ठरणारी पिढी घडविण्याचे काम प्रशिक्षण संस्थांना करावयाचे आहे. भविष्यातील स्वप्ने साकार होण्यासाठी भविष्यकाळात रोजगार उपयोगी ठरणारे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. सद्य:स्थितीत पारंपारिक शिक्षणाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. त्याचबरोबर तांत्रिक व्यावसायिक शिक्षण महागडे सुध्दा झाले आहे. अशा परिस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विविध व्यवसायांचे कौशल्य शिकविणारे प्रशिक्षण हे रोजगार व स्वयंरोजगारासाठी वरदानच आहे.

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे केवळ देशातच नव्हे तर जगभरात विविध स्वरुपातील तंत्रज्ञानाची मोठ्या प्रमाणात गरज आहे. प्रशिक्षित कुशल मनुष्यबळाचा अभाव सर्वत्र जाणवत आहे. उद्योगक्षेत्रातील मनुष्यबळाची वस्तुस्थिती अशी असताना महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्यात किमान ०१ शासकीय औ.प्र.संस्था (ITI) सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुसार ३५८ तालुक्यात ४१९ शासकीय औ.प्र.संस्था कार्यरत असून त्यांची एकूण वार्षिक प्रवेश क्षमता जवळपास एक लक्ष आहे. त्यामध्ये आदिवासी भागात आदिवासींसाठी ६१ संस्था, अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलामुलींसाठी ०४ उच्चस्तर संस्था, अल्पसंख्यांकांसाठी स्वतंत्र ०२ संस्था व ४३ शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये स्वतंत्र तुकडया, महिलांसाठी १५ तर २८ आदिवासी आश्रमशाळा औ.प्र.संस्था अशा संस्थांचा समावेश आहे. सन २०२२ पासुन नक्षलग्रस्त भागातील युवकांसाठी २ शासकीय औ.प्र.संस्था सुरू करण्यात आल्या आहेत. याच बरोबर राज्यात एकूण ५७४ खाजगी औ.प्र.संस्था कार्यरत असून त्यांच्या उपलब्ध जागा १५४३९२ इतक्या आहेत.

औ.प्र.संस्थांमध्ये एक व दोन वर्षे कालावधीचे विविध व्यवसाय शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत उपलब्ध आहेत. या व्यवसायांचा अभ्यासक्रम हा उद्योगधंद्यातील तज्ञांनी बनविलेला असून अभ्यासक्रम बनविताना कारखान्यात वापरल्या जाणाऱ्या कौशल्यांचा विचार करण्यात आला आहे. प्रशिक्षण कालावधीत कारखान्यांना भेटी देणे, उद्योगधंद्यातील तज्ञांचे व्याख्यान, कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित करणे, प्रशिक्षण संपताच शिकाऊ उमेदवारी, नोकरी मिळवून देण्यासाठी मदत करणे या सारखे उपक्रम राज्यातील सर्वच संस्थांत केले जातात.

युवकास आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दिल्यानंतर औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन सर्व दृष्टीने पूर्ण कुशल बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना अस्तित्वात आली. शिकाऊ उमेदवारांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन मिळते. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील साधारणत: २५००० औद्योगिक आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारांच्या एकूण ७०००० जागा स्थित करण्यात आलेल्या आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांपेक्षा शिकाऊ उमेदवारीसाठी उपलब्ध जागा अधिक असल्याने प्रत्येक उत्तीर्ण उमेदवारास संधी उपलब्ध आहे.

इयत्ता १० वी उत्तीर्ण उमेदवारांनी औ.प्र.संस्थेतून २ वर्षे कालावधीच्या व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण पूर्ण केल्यावर महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेल्या २ भाषा विषयांची परीक्षा उत्तीर्ण केल्यास उमेदवारास इयत्ता १२ वी ची समकक्षता देण्यात येणार आहे. तसेच इयत्ता १० वी अनुत्तीर्ण उमेदवारांनी औ.प्र.संस्थेतून २ वर्षे कालावधीच्या व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण पूर्ण केल्यावर महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेल्या २ भाषा विषयांची परीक्षा उत्तीर्ण केल्यास उमेदवारास इयत्ता १० वी ची समकक्षता देण्यात येणार आहे.

राज्यातील विविध नामांकीत औद्योगिक आस्थापनांसोबत संचालनालयाने सामंजस्य करार केलेले आहेत. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून राज्यातील शासकीय औ.प्र. संस्थांतील प्रशिक्षण सुविधांचा दर्जावाढ करणे, प्रशिक्षणार्थ्यांना अल्पमुदतीचे प्रशिक्षण देणे, On the Job Training, रोजगाराच्या संधी, निदेशक प्रशिक्षण कार्यक्रम, अद्ययावत यंत्रसामुग्री व उपकरणे उपलब्ध करुन देणे, इतर आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करुन देणे यासारख्या बाबी प्रथम प्राधान्याने राबविण्यात येत आहेत.

औ.प्र.संस्थांमधील प्रशिक्षण पूर्ण केल्यावर उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना पदविका (Diploma) अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्गात थेट प्रवेश दिला जातो. अशा प्रकारे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार, शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत रोजगाराची संधी व उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध आहे.

सन २०१३ मध्ये शासकीय औ.प्र.संस्थेतील प्रवेशप्रक्रीया व सन २०१५ मध्ये खाजगी औ.प्र.संस्थेतील प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. याचा अनुभव व होणारे फायदे लक्षात घेता राज्यातील सर्वच शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांमधील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाईन पद्धत राबविण्यात येत आहे. प्रवेशोच्छुक उमेदवारांनी व पालकांनी माहितीपुस्तिकेत देण्यात आलेली माहिती, प्रवेश पध्दती व नियम तसेच प्रमाणित कार्यपद्धती यांचा अभ्यास करुन व सद्सदविवेकबुद्धीने ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करावा जेणे करून नंतर अडचणी उद्भवणार नाहीत.

राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रवेश प्रक्रीयेत सहभागी असून सर्व संस्था हे प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र असतील. अर्ज स्विकृती केंद्रात उमेदवार ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे/ पडताळणी /स्विकृती आणि निश्चिती करु शकतील. उमेदवारांनी व पालकांनी माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली माहिती, प्रवेश पध्दती व नियमांचा अभ्यास करुनच ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करावा. प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी व जागा बहाल केलेल्या औ.प्र. संस्थेत प्रवेश निश्चित करण्यासाठी उमेदवाराने प्रवेश अर्जातील माहिती/ दाव्यांच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक मुळ दस्तऐवज/ कागदपत्रे, कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा (Photocopy) एक संच व तात्पुरत्या प्रवेश अर्जाची छापील प्रत (Print Out) नजिकच्या औ.प्र. संस्थेत पडताळणीसाठी सादर करावेत. प्रवेशासाठी आवश्यक दस्तऐवज/ कागदपत्रांची यादी प्रवेश संकेतस्थळावर Download या मथळ्याखाली तसेच माहिती पुस्तिकेत (प्रपत्र-३) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. उमेदवाराने एकच अर्ज भरावा. एकापेक्षा जास्त अर्ज भरल्यास त्या उमेदवाराचे सर्व अर्ज रद्द होतील. अशा उमेदवाराची निवड झाल्यास वा चूकीने प्रवेश देण्यात आला असल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल व उमेदवार संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेतुन बाद होईल.

प्रवेशासंबंधी नियम, आवश्यक दस्तऐवजांची माहिती व प्रवेश कार्यपध्दती या बाबत विस्तृत माहिती समाविष्ट असलेली माहिती पुस्तिका प्रवेश संकेतस्थळ https://admission.dvet.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. राज्यातील जास्तीस जास्त उमेदवारांनी कौशल्य प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा.

आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी संचालनालयातर्फे मन:पूर्वक शुभेच्छा !!

-sd-
दिगंबर अंबादास दळवी
संचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य

## अनुक्रमणिका


| तपशिल | पान क्र. |
|---|---|
| कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाबाबत संक्षिप्त माहिती | ७ |
| व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाची व याअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांची संक्षिप्त माहिती | ८ |


**माहिती पुस्तिका भाग - १**

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेशासाठी**

**प्रवेश नियमावली व प्रवेश पध्दती**


| तपशिल | पान क्र. |
|---|---|
| १.० **सर्वसामान्य** | १७ |
| १.१ माहितीपुस्तिकेत नमूद संक्षिप्त रुपे | १७ |
| १.२ परिभाषा | १८ |
| १.३ केंद्रीय प्रवेश प्रक्रीया माध्यमातून शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत होणाऱ्या प्रवेश प्रक्रीयेत सक्षम अधिकाऱ्याची भूमिका | १९ |
| १.४ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी जागांची उपलब्धता | २० |
| १.५ केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध जागांचे वाटप | २० |
| १.५.१ मूळ जिल्हा पातळीवरील ९० % जागा | २० |
| १.५.२ जिल्हाबाह्य पातळीवरील १० % जागा | २१ |
| १.५.३ महाराष्ट्र राज्याबाहेरील व अनिवासी भारतीयांकरिता जागा | २१ |
| १.६ औ.प्र.संस्थामधील जागा वाटप आणि आरक्षण | २२ |
| २.० **शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत व्यवसायांच्या प्रवेशाकरिता पात्रता निकष** | २३ |
| ३.० **उमेदवारांचे प्रकार** | २३ |
| ३.१ महाराष्ट्र राज्यातील उमेदवार व मूळ जिल्ह्यातील उमेदवारांचे प्रकार | २३ |
| ३.२ महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार | २४ |
| ३.३ अनिवासी भारतीय उमेदवार | २४ |
| ४.० **चालू प्रशिक्षण वर्षामध्ये शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत व्यवसायांचा प्रथम वर्ष पुनर्प्रवेश / नवीन प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार** | २४ |
| ५.० **आरक्षण** | २५ |
| ५.१ अपंगत्व असलेल्या उमेदवारांकरिता आरक्षण | २५ |
| ५.२ अनाथ मुलांना समांतर आरक्षण | २५ |
| ५.३ स्त्री उमेदवारांकरिता आरक्षण | २६ |
| ५.४ विशिष्ठ समाज घटकांकरीता स्थापन खाजगी औ.प्र. संस्थेत त्या घटकांसाठी प्रवेशासाठी उपलब्ध जागांबाबत आरक्षण | २६ |
| ५.५ मागासवर्गीय उमेदवारांकरिता आरक्षण | २६ |
| ५.६ धार्मिक अल्पसंख्यांकांकरिता आरक्षित जागा | २७ |
| ५.६.१ शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता आरक्षित तुकडया | २७ |
| ५.६.२ अल्पसंख्यांकांकरिता संस्था म्हणून नोंदविण्यात आलेल्या खाजगी औ.प्र. संस्था | २८ |
| ५.७ अनुसूचित जाती कार्यक्रम (SCP), आदिवासी उपयोजना (TSP) व आदिवासी सार्वत्रिकरण योजनेंतर्गत शासकीय औ.प्र.संस्थामध्ये असलेल्या आरक्षणाचा आकृतीबंध | २९ |
| ६.० **विविध प्रकारच्या उमेदवारांकरिता आवश्यक असणारी कागदपत्रे** | २९ |
| ७.० **भाषांतर** | २९ |
| ८.० **गुणवत्तेसाठी गुणाधिक्य** | २९ |

| तपशिल | | पान क्र. |
|---|---|---|
| ९.० | **गुणानुक्रमांक देणे** | ३० |
| | ९.१ गुणानुक्रम | ३० |
| | ९.२ सम गुणवत्ता झाल्यास सापेक्ष गुणवत्ता | ३१ |
| | ९.३ पूर्व तपासणी / पूर्व मुल्यांकनामुळे गुणातील बदल | ३१ |
| १०.० | **केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्यांमधील प्रवेशाबाबत नियम** | ३१ |
| ११.० | **जागा वाटपाची तर्क पध्दती** | ३२ |
| | ११.१ टप्पा प्रथम - सर्व उमेदवारांकरिता | ३२ |
| | ११.२ टप्पा दुसरा - संबंधित खुल्या/मागासवर्गातील उमेदवार | ३२ |
| | ११.३ टप्पा तिसरा - विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता | ३२ |
| | ११.४ टप्पा चौथा - संबंधित मागास प्रवर्ग उमेदवार गटाकरिता | ३३ |
| | ११.५ टप्पा पाचवा - सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता | ३३ |
| | ११.६ टप्पा सहावा - अपंग प्रवर्गातील उमेदवारांकरिता | ३३ |
| | ११.७ टप्पा सातवा - धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता | ३३ |
| | ११.८ टप्पा आठवा - राज्यस्तरीय गुणांकानुसार सर्व आरक्षित उमेदवारांकरिता (मूळ जिल्हा आणि जिल्हाबाह्य जागा एकत्रित करुन) | ३३ |
| | ११.९ टप्पा नववा - सर्व राज्यस्तरीय उमेदवारांकरिता फक्त गुणक्रमांकानुसार (कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाशिवाय) | ३३ |
| १२.० | **प्रवेश फेरीनुसार जागा वाटपाच्या टप्प्यांची अंमलबजावणी** | ३४ |
| १३.० | **केंद्रीय प्रवेश पध्दतीचे टप्पे** | ३५ |
| | १३.१ टप्पा क्र. I - माहिती पुस्तिका | ३५ |
| | १३.२ टप्पा क्र. II - ऑनलाईन अर्ज भरणे व अर्ज शुल्क जमा करणे | ३५ |
| | १३.३ टप्पा क्र. III - महाराष्ट्रातील, महाराष्ट्र राज्याबाहेरील आणि अनिवासी भारतीय उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे | ३७ |
| | १३.४ टप्पा क्र. IV - प्रवेश फेरीसाठी पर्याय देणे | ३७ |
| | १३.५ टप्पा क्र. V - जागा वाटप करणे (Allotment of Seat) | ३७ |
| | १३.६ टप्पा क्र. VI - संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यक्तीश: हजर राहून केंद्रीय प्रवेश प्रक्रीया फेरीमध्ये प्रवेशाचे निश्चितीकरण करण्याचे नियम | ३८ |
| | १३.७ टप्पा क्र. VII - पाचवी प्रवेशफेरी - जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी | ३९ |
| | १३.८ टप्पा क्र. VIII - संस्था स्तरावरील प्रवेश | ३९ |
| | १३.९ टप्पा क्र. IX - प्रवेशोत्तर कार्यवाही | ३९ |
| १४.० | **मूळ प्रमाणपत्रे ठेवून घेण्याबाबत** | ४० |
| १५.० | **प्रशिक्षण शुल्क, अनामत रक्कम व सवलती बाबत विवरण** | ४१ |
| १६.० | **प्रवेश रद्द प्रक्रीया व शुल्क परतावा** | ४२ |
| १७.० | **व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना** | ४३ |
| १८.० | **संकीर्ण** | ४५ |
| १९.० | **वसतीगृहात राहण्याची सोय** | ४६ |
| २०.० | **आचरण आणि शिस्त** | ४६ |
| २१.० | **रॅगिंग प्रतिबंधाबाबत कार्यवाही** | ४६ |
| २२.० | **हमीपत्र** | ४८ |
| २३.० | **प्रशिक्षणार्थ्यांची बदली** | ४९ |

| तपशिल | पान क्र. |
|---|---|
| प्रपत्र | |
| प्रपत्र - १: व्यवसाय तपशीलाची यादी आणि पात्रता | ५० |
| प्रपत्र - २: शासकीय आणि खाजगी औ.प्र.संस्थांची यादी | ५८ |
| प्रपत्र - ३: प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रांची यादी | ५९ |
| प्रपत्र - ४: अर्ज स्वीकृती केंद्राकडून उमेदवारांना विविध सेवा पुरविण्याकरिता आकारलेले शुल्क | ६४ |
| प्रपत्र - ५: जिल्हास्तरीय समुपदेशन फेरी राबविणाऱ्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची यादी | ६५ |
| प्रपत्र - ६: विविध योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची यादी | ६७ |
| प्रपत्र - ७: विशिष्ठ समाज घटकांकरीता स्थापन खाजगी औ.प्र. संस्थेत त्या घटकांसाठी प्रवेशासाठी उपलब्ध जागांबाबत आरक्षण | ६९ |

## माहितीपुस्तिका भाग - २
## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेश प्रक्रीयेतील विविध स्तरावर करावयाच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती


| | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १.० | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करणे व अर्ज शुल्क जमा करण्याच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती | ७० |
| २.० | प्रवेश अर्ज पडताळणी (Verification) व निश्चित (Confirmation) करण्याच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती | ८७ |
| ३.० | औ.प्र.संस्थेतील प्रवेशासाठी औ.प्र. संस्थानिहाय व व्यवसाय निहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्याच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती | ८८ |
| ४.० | प्राथमिक गुणवत्ता यादी बाबत हरकती नोंदविण्यासाठी (Grievance Redressal) अनुसरावयाची प्रमाणित कार्यपध्दती | ९१ |
| ५.० | प्रवेश अर्ज शुल्क भरलेल्या उमेदवारांसाठी गुणवत्ता क्रमांक व प्रवेशस्थिती तपासण्यासाठी प्रमाणित कार्यपध्दती | ९१ |
| ६.० | प्रवेश फेरीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांसाठी निवडपत्र (Allotment Letter) प्राप्त करण्याची प्रमाणित कार्यपद्धती | ९२ |
| ७.० | प्रवेशनिश्चिती करणाची प्रमाणित कार्यपध्दती | ९२ |
| ८.० | खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश निश्चितीकरणाची प्रमाणित कार्यपध्दती | ९३ |
| ९.० | जिल्हास्तरीय समुपदेशन फेरीत प्रवेशाकरिता उमेदवारांनी अवलंबविण्याची प्रमाणित कार्यपध्दती | ९४ |
| १०.० | प्रवेश रद्द करण्याकरिता उमेदवारांनी अवलंबविण्याची प्रमाणित कार्यपध्दती | ९४ |
| ११.० | नोंदणीकृत उमेदवारांसाठी पासवर्ड बदलणे अथवा पुनर्स्थापित (Forgot/ Change/ Reset Password) करण्याच्या कार्यवाहीसाठी प्रमाणित कार्यपध्दती | ९५ |
| १२.० | प्रवेश प्रक्रियेतील टप्पे | ९७ |

कौशल्यम् बलम्

# कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

सन २०१४ पासून मा. पंतप्रधान यांच्या "**मेक इन इंडिया**" या संकल्पनेस अनुसरुन "**स्कील इंडिया**" या नावाने कौशल्य विकास या कार्यक्रमास केंद्र शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून, या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय स्तरावर कौशल्य विकास व उद्योजकता या स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना केली आहे. या अनुषंगाने तसेच मा. मुख्यमंत्री यांच्या "**मेक इन महाराष्ट्र**" या ध्येयास अनुसरुन राज्यात कौशल्य विकास अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी दिनांक १५.०१.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पूर्वीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे रुपांतर करुन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग या स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत एकीकडे बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हे शासनासमोर सर्वात मोठे आव्हान आहे तर दुसरीकडे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये कुशल मनुष्यबळाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच मेक इन इंडिया, डिजीटल इंडिया, स्वच्छ भारत, स्मार्ट शहरे, सांसद आदर्श ग्रामयोजना, प्रधानमंत्री जन धन योजना इत्यादी उपक्रमांना राष्ट्रीय प्राधान्य देण्यात आल्याने देखील विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात निर्माण होत आहेत. याशिवाय सध्या राज्यात शासनाचे विविध विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील महामंडळे यांचे मार्फत विविध प्रवर्गातील लाभार्थींना वर नमूद विविध प्रकारच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, यामध्ये समन्वयाचा अभाव असून एकसूत्रता नसल्यामुळे या योजनांच्या फलनिष्पत्तीची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध न होता या योजनांचे नियोजन, कार्यान्वयन, संनियंत्रण, मूल्यमापन इ. बाबींवर खर्च होणाऱ्या साधनांचा अचूक, किफायतशीर व प्रभावी वापर होत नव्हता. ही पार्श्वभूमी लक्षात घेता राज्यातील मनुष्यबळाचे कौशल्य विकसित करुन त्यांना मागणी असलेल्या क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्धतेद्वारे परिवार व समाजाचा एक उत्पादक सदस्य म्हणून सन्मानाने आपले भावी आयुष्य समर्थपणे घडविता यावे, तसेच विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे एकात्मिकरित्या नियोजन व अंमलबजावणीतून "मेक इन इंडिया" आणि "मेक इन महाराष्ट्र" यासारख्या संकल्पना साकार करुन आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण करता यावे, यासाठी कौशल्य विकासासंबंधी सर्व समावेशक अभियान राबविण्याचा शासनाचा मानस आहे.

वरील पार्श्वभूमीवर मा.पंतप्रधान यांच्या "स्कील इंडिया" या संकल्पनेस अनुसरून महाराष्ट्र राज्याने "**कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र**" हे ध्येय समोर ठेवले असून, राज्यातील युवक-युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी "प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता विकास अभियान" राबविण्यात येत आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर खालील संस्था कार्यान्वीत आहेत.

**प्रशिक्षण शाखा**

१. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (DVET)
२. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (MSBSVET)
३. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS)
४. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (MSSU)

**रोजगार शाखा**

५. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता आयुक्तालय

**उद्योजकता शाखा**

६. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

महाराष्ट्र राज्यात सर्व स्तरावर तांत्रिक शिक्षण देण्याची जबाबदारी एकत्रितरित्या सोपविण्याच्या दृष्टीने १९४८ साली तंत्रशिक्षण संचालनालयाची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर अल्पावधीतच महाराष्ट्र राज्याने औद्योगिक क्षेत्रात मोठी झेप घेतली. औद्योगिक उत्पादनाच्या घटक रचनेत लक्षणीय बदल झाल्यामुळे या औद्योगिक घटकांना निरनिराळया स्तरावर लागणारे तांत्रिक प्रशिक्षित मनुष्यबळ व त्यांच्याकरिता पुनर्प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने राज्यात प्रशिक्षणाच्या सोईमध्ये प्रचंड वेगाने वाढ झाली. या विविध कार्यक्रमांचे संचालन व प्रशासन यांची सर्वांगीण प्रगती होण्याच्या दृष्टीने तंत्र शिक्षण संचालनालयाचे १९८४ साली विभाजन करुन तंत्रशिक्षण संचालनालय व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अशी दोन संचालनालये निर्माण करण्यात आली. यापैकी व्यवसाय शिक्षणांतर्गत माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम राबविले जातात व व्यवसाय प्रशिक्षणांतर्गत केंद्रशासन पुरस्कृत शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना व शिकाऊ उमेदवारी योजना या प्रमुख योजना राबविण्यात येतात.

**संचालनालयाचे ध्येय:**

- औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल तांत्रिक प्रशिक्षित मनुष्यबळाचा सातत्याने पुरवठा करणे.
- तंत्रज्ञानात कालानुरूप होणारे बदल विचारात घेऊन त्यानुसार प्रशिक्षणात सुधारणा करुन प्रशिक्षणाचा दर्जा अद्ययावत ठेवणे.
- व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण समाजातील सर्व स्तरातील घटकांना उपलब्ध करुन देऊन उमेदवाराला रोजगार व स्वयंरोजगारासाठी सिध्द करणे.

## व्यवसाय प्रशिक्षणाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजना

### १. शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेची ठळक वैशिष्ट्ये:

१.१ राज्यातील एकूण ४१९ शासकीय व ५७४ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधुन एकूण ८३ प्रकारच्या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यात अभियांत्रिकी गटातील एक वर्ष कालावधीचे एकूण १८ व्यवसाय अभ्यासक्रम, दोन वर्ष कालावधीचे एकूण ३७ व्यवसाय अभ्यासक्रम, तसेच बिगर अभियांत्रिकी गटात एक वर्ष कालावधीचे २८ व्यवसाय अभ्यासक्रमांचा अंतर्भाव आहे. औ.प्र.संस्थेतील १० व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण व ७२ व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण व ०१ व्यवसाय अभ्यासक्रमासाठी १२ वी उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता विहीत करण्यात आली आहे. प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमानुसार या व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. अभ्यासक्रम यशस्वारीत्या पूर्ण करुन परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेवारास प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांच्या कडून राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषदेचे (NCVT) राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (National Trade Certificate-NTC) दिले जाते.

१.२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये प्रात्यक्षिक (Practical) भाग ७० टक्के व सैध्दांतिक (Theory) भाग ३० टक्के आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यावर रोजगार व स्वयंरोजगाराबरोबरच उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना पदविका अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्गात थेट प्रवेश दिला जातो.

१.३ राज्यातील सर्व समाजघटकांना व्यवसाय शिक्षणाचा लाभ मिळावा या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या शासकीय औ.प्र.संस्थांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | औ.प्र.संस्थांचे प्रकार | शासकीय औ.प्र.संस्था |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण औ.प्र.संस्था | ३०७ |
| २ | आदिवासी उमेदवारांसाठी | ६१ |
| ३ | फक्त महिलांसाठी | १५ |
| ४ | आदिवासी आश्रमशाळामध्ये औ.प्र.संस्था | २८ |
| ५ | अनु.जाती व नवबौध्द उमेदवारांसाठी | ४ |
| ६ | अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी | २ |
| ७ | अतिरेकी कारवाईग्रस्त जिल्हयातील युवकांसाठी औ.प्र.संस्था | २ |
| | Total | ४१९ |

१.४ प्रवेश प्रक्रीयेत पारदर्शकता व प्रवेशोच्छुक उमेदवारांच्या सोईसाठी राज्यातील शासकीय औ.प्र.संस्थांची प्रवेशसत्र ऑगस्ट २०१३ सत्राची तथा शासकीय बरोबरच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रवेशसत्र ऑगस्ट २०१५ पासूनची प्रवेशप्रक्रीया ही केंद्रीय ऑनलाईन प्रवेश पध्दतीने राबविण्यात येत असून याप्रकारे ऑनलाईन स्वरुपात प्रवेश प्रक्रीया राबविणारे महाराष्ट्र हे देशातील प्रथम राज्य ठरले आहे.

१.५ औ.प्र.संस्थेतील प्रवेशासाठी सर्वसाधारण दिनांक ०१ जून पासून प्रवेश अर्ज उपलब्ध करुन देण्यात येत असून प्रवेशाची सर्व कार्यवाही दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत पूर्ण होऊन दिनांक ०१ सप्टेंबर पासून नियमित प्रशिक्षणास सुरुवात होते. प्रवेशाबाबत तपशिलवार माहिती प्रादेशिक कार्यालय, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे उपलब्ध असते. प्रवेशाच्या अधिक माहितीसाठी https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

१.६ औ.प्र.संस्थेत प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणांसह सुसज्ज कार्यशाळा, प्रात्यक्षिकासाठी हत्यार संच, कच्चामाल, ॲपरन आणि स्टेशनरी, अभ्यासाकरिता ग्रंथालय/पुस्तक पेढी, दररोज ये-जा करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी रेल्वे व बस मासिक पासकरिता शिफारसपत्र, गरजू विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश, आदिवासी मुला-मुलींकरिता स्वतंत्र वसतिगृह, अपंग विद्यार्थ्यांसाठी नियमाप्रमाणे सुविधा, रोजगार व स्वयंरोजगारासाठी नाव नोंदणी या बाबी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

१.७ प्रशिक्षण शुल्क: शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांसाठी अत्यंत माफक प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येते. आर्थिकदृष्टया मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना (EBC/SEBC/EWS) प्रशिक्षण शुल्कातुन सूट मिळते तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना (उन्नत गटातील प्रशिक्षणार्थी वगळून) प्रशिक्षण शुल्क माफी देण्यात येते.

१.८ निर्वाहभत्ता: वसतिगृहात राहणाऱ्या व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या (ST) प्रशिक्षणार्थ्यांना आदिवासी विभागाने मंजूर केल्यानुसार प्रतिमाह अनुक्रमे रु. ६००/- व रु. ५००/- या प्रमाणे निर्वाहभत्ता देण्यात येतो.

१.९ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन निर्णय क्रमांक आयटीआय-२०२२/प्र.क्र.७९/व्यशि-३, दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ अन्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या सर्व प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागार्स वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अल्पसंख्याक समाजातील व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया मागास घटकातील प्रशिक्षणार्थ्यांना ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखांच्या मर्यादेत आहे. अशा सर्व पात्र प्रशिक्षणार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून दर महा रुपये ५००/-इतके दराने विद्यावेतन अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

१.१० शिष्यवृत्ती: अनुसूचित जातीच्या (SC) प्रशिक्षणार्थ्यांना तसेच अल्पसंख्यांक समाजातील प्रशिक्षणार्थ्यांना (Minority) मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती नियमाप्रमाणे अनुज्ञेय आहे.

## २. शिकाऊ उमेदवारी योजना (शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१):

२.१ योजनेची उद्दिष्ट्ये : युवकास आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दिल्यानंतर उद्योगात असणाऱ्या प्रक्रीयांमध्ये लागणारी यंत्रसामुग्री तसेच नवीन व आधुनिक तंत्रज्ञानानुसार औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन सर्व दृष्टीने पूर्ण कुशल बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना अस्तित्वात आली.

२.२ योजनेचे स्वरुप : देशातील खाजगी, निमशासकीय व शासकीय उद्योगधंद्याच्या गरजांप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी केंद्रशासनाने उद्योगधंद्यामध्ये इंजिनिअरींग , केमिकल, प्रिंटिंग, कॅटरींग इत्यादी ३९ गटात वर्गीकरण केले असून २५८ व्यवसाय निर्देशित केले आहेत. महाराष्ट्र राज्यात त्यातील एकूण १८१ व्यवसायात प्रशिक्षण देण्यात येते. कालमानाप्रमाणे आवश्यकतेनुसार नवीन व्यवसाय निर्देशित करण्यात येतात व कालबाहय व्यवसाय वगळण्यात येतात. विविध व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण घेतलेल्या उमेवारांबरोबरच अप्रशिक्षित (Freshers) उमेदवारांची शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत निवड करण्यात येते.

२.३ महाराष्ट्र राज्यातील आस्थापनांची माहिती उपलब्ध करुन घेणे: महाराष्ट्र राज्यात विविध विभागांकडून त्यांच्याकडे नोंदी असलेल्या आस्थापनांची माहिती उपलब्ध करुन घेऊन ती संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या प्रादेशिक कार्यालय व संबंधित मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यांचेकडे सर्वेक्षण/पुनर्सर्वेक्षण करण्याकरिता पाठविली

जाते. संबंधित मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार त्या आस्थापनेत जाऊन शिकाऊ उमेदवारी योजना १९६१ प्रमाणे प्रशिक्षण सुविधा व एकूण कामगारांच्या २.५ ते २५ टक्के या प्रमाणात शिकाऊ उमेदवारांची संख्या निश्चित केली जाते. या निश्चित केलेल्या जागांवर भरती करण्याकरिता कार्यालयीन अधिसूचना निर्गमित केली जाते.

२.४ शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत ४५ शासकीय व १८० अशासकीय मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रामध्ये प्रशिक्षण देण्याची सोय आहे.

२.५ अखिल भारतीय व्यवसाय परीक्षा:

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.MSDE-१४(०३)/२०२१-AP (PMU) दिनांक २०.१२.२०२१ च्या पत्रान्वये दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून शिकाऊ उमेदवारीच्या परीक्षा पध्दतीत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यांत आली आहे.

२.५.१ शिकाऊ उमेदवारी परीक्षेसाठी शिल्प कारागीर योजनेच्या व्यवसायातून औ.प्र.संस्थेमधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना Trade Theory, Workshop Calculation and Science, Employability Skills व Engineering Drawing या विषयांची सूट दिली जाईल.

२.५.२ शिकाऊ उमेदवारांची संलग्न आस्थापनांमध्ये फक्त प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाईल.

२.५.३ Fresher (Non ITI) शिकाऊ उमेदवारांचीच Trade Theory, Workshop Calculation and Science, Employability Skills, Engineering Drawing आणि Practical ची परीक्षा घेतली जाईल.

२.६ शिकाऊ उमेदवारांची भरती प्रक्रिया: या योजनेखाली विहीत अर्हताधारक शिकाऊ उमेदवार नेमण्याचे अधिकार व जबाबदारी संबंधित आस्थापनेची आहे. आस्थापनेचे प्रतिनिधी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रत्यक्ष जाऊन मुलाखत/लेखी परिक्षेद्वारे उमेदवारांची निवड करतात. आस्थापना/ सेवायोजन कार्यालय जाहिरात किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांची यादी मागवून उमेदवारांची निवड करतात. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या इच्छुक उमेदवारांना शासकीय मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रातून मुलाखत पत्र देऊन त्यांना शिकाऊ उमेदवारी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच आस्थापना व शिकाऊ उमेदवार एकाच ठिकाणी येण्याकरिता प्रादेशिक स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये भरती मेळाव्याचे आयोजन केले जाते. सदर भरती मेळाव्यात आस्थापना अधिकारी उमेदवारांची मुलाखत घेऊन त्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून नियुक्त करतात. भरती मेळाव्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रांमध्ये दिली जाते, तसेच भरती मेळाव्याचे वेळापत्रक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या सूचनाफलकावर लावले जाते व सर्व आस्थापनांना कळविले जाते.

२.७ शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवार भरतीचा कालावधी: राज्यामध्ये शिकाऊ उमेदवारांची भरती वर्षातून केव्हाही करण्यात येते.

२.८ वय व शारिरिक पात्रता:

| | | | |
|---|---|---|---|
| वय: | १४ वर्षे पूर्ण | वजन: | २५.४ किलो (कमीत कमी) |
| उंची: | १३७ से.मी (किमान) | दृष्टी: | चांगली |

उमेदवारांना शारिरीकदृष्टया पात्र असल्याचे अधिकृत वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. शारिरीकदृष्टया अपंग उमेदवारांचा ठराविक व्यवसायासाठी वैद्यकीय अधिकारी यांचे शिफारशीनुसार विचार करण्यात येतो.

२.९ शिकाऊ उमेदवारांना मिळणारे विद्यावेतन: शिकाऊ उमेदवारांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन मिळते. सद्य:स्थितीत प्रचलित दर खालील प्रमाणे आहेत.

(रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, नवी दिल्ली यांची अधिसूचना जी.एस.आर. ६८६ (अ), दिनांक २५ सप्टेंबर २०१९)

| अ.क्र. | प्रकार | विद्यावेतनाचा प्रतिमहा किमान दर |
|---|---|---|
| १. | इयत्ता ५ वी ते ९ वी उत्तीर्ण | रु.५,०००/- |
| २. | इयत्ता १० वी उत्तीर्ण | रु.६,०००/- |
| ३. | इयत्ता १२ वी उत्तीर्ण | रु.७,०००/- |
| ४. | राष्ट्रीय किंवा राज्य प्रमाणपत्रधारक | रु.७,०००/- |
| ५. | तंत्रज्ञ (व्यावसायिक) | रु.७,०००/- |
| ६. | तंत्रज्ञ (पदविकाधारक) | रु.८,०००/- |
| ७. | पदवीधारक | रु.९,०००/- |

शिकाऊ उमेदवारीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात पहिल्या वर्षातील अनुज्ञेय विद्यावेतन दराच्या अनुक्रमे १०% आणि १५% वाढ अनुज्ञेय असते.

२.१० औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत प्रशिक्षण कालावधीत अनुज्ञेय असलेली सूट विचारात घेऊन प्रवेश दिला जातो. त्यांची प्रशिक्षणाची सूट लक्षात घेऊन त्यांना त्या अनुषंगाने विद्यावेतन देय असते.

२.११ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार, शिकाऊ उमेदवारी योजनेतर्गत रोजगाराची व उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध असल्याने शिकाऊ उमेदवारी योजनेतर्गंत प्रशिक्षित व अप्रशिक्षित उमेदवारांसाठी उपलब्ध असणाऱ्या जागा रिक्त राहतात.

## ३. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजना:

ज्या संस्थांचा जागतिक बँक प्रकल्पांतर्गत समावेश झालेला नाही, अशा देशातील एकूण १३९६ शासकीय औ.प्र.संस्थांचा दर्जावाढ या योजनेंतर्गत करण्यात आला आहे. यात राज्यातील एकूण २५० संस्थांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या योजनेत सहभागी संस्थांना प्रत्येकी रु. २.५० कोटी रक्कम व्याजमुक्त कर्ज रुपाने केंद्रशासनाकडून देण्यात आलेली आहे. सदरहू कर्जाची परतफेड ११ व्या वर्षापासून ३० व्या वर्षापर्यंत समान २० हप्त्यात करावयाची आहे.

## ४. औद्योगिक मूल्य वर्धित कौशल्य वाढ (STRIVE)

संस्थात्मक प्रशिक्षण प्रणालीमध्ये आवश्यक असलेल्या संस्थात्मक सुधारणांना प्रोत्साहित करण्यासाठी भारत सरकारने प्रकल्प विकसित केला आहे. औ.प्र. संस्था आणि शिकाऊ उमेदवारी योजना चार क्षेत्रावर केंद्रित आहे.

४.१ **क्षेत्र १:** प्रशिक्षण सुविधा, यंत्र सामग्री शाधन सामग्रीचा दर्जा वाढ करून आणि नवीन व्यवसाय अभ्यासक्रम वाढवून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची कामगिरी सुधारणे. महाराष्ट्र राज्याने ७३ ते ८१ शासकीय आयटीआयचे उद्दिष्ट निश्चित केले असून केली असून आतापर्यंत ३८ शासकीय आयटीआय आणि ४ खासगी आयटीआय निवडल्या गेल्या आहेत. प्रशिक्षण सुविधांच्या उन्नतीकरिता संस्थेतील प्रवेशाच्या आधारावर प्रत्येक आयटीआयला रु. १.५० कोटी ते २.५०० कोटी एवढा निधी प्राप्त होणार आहे.

४.२ **क्षेत्र २:** औ.प्र. संस्था आणि शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेस सहाय्य करण्यासाठी राज्य सरकारची वाढीव क्षमता आणि औ.प्र. संस्थाच्या एकंदर नियामक व परिचालन वातावरणात सुधारणा करण्याकरिता आणि राज्य स्तरावर औद्योगिक समूह (Industry Clusters) स्थापन करण्यासाठी राज्य सरकारांना पाठबळ प्रदान करणे

४.३ **क्षेत्र ३:** शैक्षणिक साहित्याचे आधुनिकीकरण करून तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून शिकविण्याच्या व शिकण्याच्या दर्जा उंचावणे.

४.४ **क्षेत्र ४:** क्लस्टर अप्रोचच्या माध्यमातून औपचारिक सुधारित व विस्तृत शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाद्वारे एमएसएमईंना शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी सक्षम बनविणे

## ५. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (NAPS)

केंद्र शासनाची National Apprenticeship Promotion Scheme - NAPS ही योजना दिनांक १९.०८.२०१६ पासून शिकाऊ उमेदवारांच्या भरतीकरीता प्रोत्साहन देण्यासाठी सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासनाचे शिकाऊ उमेदवारांच्या भरतीचे प्रमाण वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. याकरिता केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो

शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती करण्यासाठी आस्थापनांना दिनांक १९.०८.२०१६ पासून दरमहा प्रति शिकाऊ उमेदवार देय विद्यावेतनाच्या २५% किंवा रु. १५००/- यापैकी कमी असलेली रक्कम आस्थापनेला देय असेल.

या योजने अंतर्गत फ्रेशर शिकाऊ उमेदवारांच्या मुलभूत प्रशिक्षण कालावधीत ही रक्कम देय नाही. फ्रेशर शिकाऊ उमेदवारांच्या मुलभूत प्रशिक्षणाची रक्कम (रु. ७५००/- जास्तीत जास्त) ५०० तास/३ महिने एवढी देय राहील.

## ६. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (MAPS)

शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्यासाठी महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (MAPS) राबविण्यास शासन निर्णय दि.०३.०६.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रु.५०००/- रु. यापैकी कमी असलेले विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना शासनातर्फे अनुज्ञेय राहील. तथापि, राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत आस्थापनांना अनुज्ञेय ठरणारे विद्यावेतन प्रतिपूर्ती आणि महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारांना अनुज्ञेय ठरणारे विद्यावेतनाचा आर्थिक लाभ एकत्रितपणे देय एकूण विद्यावेतनाच्या ७५% पेक्षा अधिक अनुज्ञेय ठरणार नाही. सदर योजनेंतर्गत मुलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) रु.२०/- प्रतितास या दराने (केंद्र शासनाकडून मिळणारी प्रतिपूर्ती रु.१५/- प्रतितास वजा करुन) जास्तीत जास्त ५०० तासांकरीता रु.२,५००/- एवढा प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील. तसेच ज्या मुलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) केंद्र शासनाकडून प्रशिक्षण प्रतिपूर्ती मिळणार नाही, अशा संस्थांना रु.२०/- प्रतितास या दराने जास्तीत जास्त ५०० तासांकरीता रु.१०,०००/- एवढी प्रशिक्षण खर्च रक्कम प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील.

**७. राज्यातील शासकीय औ.प्र.संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या इतर योजना :**

**उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना**

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शासकीय तंत्र शाळा/महाविद्यालय, Advance Vocational Training Institutes, Hi Tech Institues व शासकीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम योजनांची (POTS) प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक आयटीआय-२०२१/प्र.क्र.१४७/ व्यशि-३, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२२ निर्गमीत करण्यात आला आहे.**

**व्यवसायानुसार प्रशिक्षणार्थ्यांना अभ्यासक्रमात नमूद केलेले Skill Sets नुसार Job तयार करण्यात येतात. तसेच इतरही समाजोपयोगी कौशल्ययुक्त कामे करण्यात येतात. अशा प्रकारे नाविन्यपूर्ण Job तथा उपयोगी वस्तु तयार केल्यामुळे प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक यांमधील तंत्र कुशलता वृध्दींगत होत असून या माध्यमातून अधिकाधिक प्रशिक्षणार्थ्यांना आवश्यक Skill Sets सह प्रात्यक्षिकाभिमुख प्रशिक्षण प्राप्त होत असते.**

**प्रशिक्षणार्थ्यांकडून तयार करण्यात येणाऱ्या या Jobs मध्ये कालानुरूप अद्ययावतीकरण/सुधारणा करून सदरील वस्तुंची जीवनावश्यक वस्तु /उपयोगी वस्तु म्हणून बाजारपेठेत उपलब्धता निर्माण करण्यात येते. या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव व अर्थाजन प्राप्त होते व संस्थेस देखील महसूल प्राप्त होतो. यातुनच DGT, नवी दिल्ली यांचे स्तरावरुन निर्धारित करण्यात आलेल्या मानकांनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थी यांनी करावयाच्या प्रात्यक्षिकासाठी आवश्यक कच्च्या मालाच्या एकूण खर्चावरील काही प्रमाणात निधी संस्थेमधुन "उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना- POTS" च्या माध्यमातून मिळविण्याची तरतूद नमूद आहे.**

**अशा पद्धतीने सदर योजना प्रशिक्षणार्थ्यांचे / निदेशकांचे कौशल्य वृद्धींगत करण्यासाठी व संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी लाभदायक आहे.**

**८. सामंजस्य करार (MoU):**

केंद्र शासनाच्या दिनांक २७.०२.२०१४ रोजीच्या अधिसुचनेनुसार कंपनी कायदयाखाली नोंदणीकृत असलेल्या सर्व औद्योगिक आस्थापनांना त्यांच्या वार्षिक उत्पन्नापैकी काही निधी हा Corporate Social Responsibility Policy या अंतर्गत विविध समाजोपयोगी कामांसाठी खर्च करावयाचा असतो त्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे शासन निर्णय क्र. पीपीपी २०१३/प्र.क्र.१०३/१३/व्यशि-५, दिनांक २९ मे, २०१५ अन्वये Corporate Social Responsibility (CSR) अंतर्गत विविध औद्योगिक आस्थापनांबरोबर करण्यात येणाऱ्या सामंजस्य करारास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने आजपर्यंत राज्यातील विविध नामांकीत औद्योगिक आस्थापना जसे Tata Motors, Tata Power, Mahindra & Mahindra, Samsung, Maruti Suzuki, Siemens, Tata Trust, Bosch, Volkswagen, Bharat Forge, Sandvik, Hindustan Aeronautics, Bharat Electronics Ltd., Mazgaon Dock, Loreal, Konkan Railway, Schindler इत्यादीं समवेत सामंजस्य करार केलेले आहेत. सद्य:स्थितीत ३८ नामांकीत औद्योगिक आस्थापनांशी सामंजस्य करार करण्यात आलेले असून त्यांच्याव्दारे साधारणत: रु. ६५ कोटी निधीचा विनियोग करुन राज्यातील शासकीय औ.प्र. संस्थांतील प्रशिक्षण सुविधांचा दर्जावाढ करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याअंतर्गत राज्यातील शासकीय औ.प्र.संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना अल्पमुदतीचे प्रशिक्षण देणे, On the Job Training,

रोजगाराच्या संधी, निदेशक प्रशिक्षण कार्यक्रम, अद्ययावत यंत्रसामुग्री व उपकरणे उपलब्ध करुन देणे, इतर आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करुन देणे यासारख्या बाबी प्रथम प्राधान्याने राबविण्यात येत आहेत.
ग्रामीण भागातील प्रशिक्षणार्थ्यांना औद्योगिक आस्थापनेतील तज्ञांचे मार्गदर्शन प्राप्त होण्यासाठी संचालनालय, L&T Ltd व Confederation of Indian Industry यांच्या मार्फत प्रत्येक शनिवारी Video Conferencing च्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो.

९. कौशल्य विकास केंद्रे ( अल्प मुदतीचे व्यवसाय कौशल्य अभ्यासक्रम)
राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विविध अल्पमुदत अभ्यासक्रम राबवण्यात येतात सदर अल्पमुदत अभ्यासक्रम हे NSQF COMPLIANT असतात व सेक्टर स्किल कौन्सिल कडून मान्यताप्राप्त असतात ज्या उमेदवारांना या अल्पमुदत अभ्यासक्रमांमध्ये सहभागी व्हायचे असेल असे उमेदवार नजीकच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये जाऊन आपले नाव नोंदणी करू शकतात.

१०. Dual System of Training (DST) ही योजना राज्यातील अधिकाधिक संस्थामध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी संचालनालयाची आग्रही भुमिका असून यासाठी सातत्याने प्रादेशिक कार्यालयांना सुचना देऊन पाठपुरावा करण्यात येत आहे.
सद्यस्थितीत राज्यातील एकुण ५५ शासकीय व १० खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अशा एकुण ६५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये १५७ व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडयाना Dual System of Training (DST) अंतर्गत संलग्नता प्राप्त झालेली आहे. प्रवेश सत्र २०२२-२३ मध्ये DST अंतर्गत ५५ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व १० खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील एकूण २८ व्यवसाय अभ्यासक्रमाकरीता १५७ तुकडयामध्ये १७६५ प्रशिक्षणार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत. सदर प्रशिक्षणार्थ्यांचे DST अंतर्गत विविध औद्योगिक आस्थापनांमध्ये प्रशिक्षण सुरु आहे.

**व्यवसाय शिक्षण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना**

**१. माध्यमिक स्तरावरील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम:**

१.१ सन १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर कार्यानुभव आधारीत विषय घेण्यावर भर देण्यात आला होता, जेणेकरुन भावी आयुष्यात विद्यार्थी वर्ल्ड ऑफ वर्कसाठी तयार होऊ शकतील. सदर अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मेकॅनिकल, इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विषयातील मुलभूत कौशल्ये आत्मसात करता येतात. त्या कौशल्याचा दैनंदिन जीवनात उपयोग करता येतो. आवश्यकतेनुसार सदर कौशल्यांची व्याप्ती वाढविण्यासाठी विद्यार्थी अभियांत्रिकी क्षेत्रातील उच्च शिक्षणाकडे वळू शकतो अथवा आपल्या आवडीप्रमाणे रोजगार/स्वयंरोजगार निवडू शकतो. माध्यमिक स्तरावर कार्यानुभव विषयाऐवजी “तांत्रिक” विषयात उपलब्ध तीन विषयांपैकी एक ऐच्छिक विषय म्हणून निवडता येतो.

१.२ इ. ९ वी व १० वी मध्ये पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविला जातो. शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/केंद्रांच्या १० कि.मी. परिसरातील सहयोगी शाळांमधील इ. ९वी व १०वी स्तरावरील शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आठवडयात १ दिवस पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविला जातो.

१.३ परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुई / इ.१० वी व इ.१२वी व्यवसाय अभ्यासक्रम / मूल्यमापन योजना / ६७६६, दिनांक-०१/१२/२०२१ पासून शैक्षणिक वर्षापासून पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत खालील अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

- X१: Multi Skill Assistant Technician/ Introducation to Basic Technology
- X२: Automotive Service Technician
- X३: Store Operations Assistant
- X ४: Assistant Beauty Therapist
- X ६: Tourism and Hospitality -Food & Beverage Service Trainee
- X ७: Agriculture-Solanaceous Crop Cultivator
- X ८: Electronics and Hardware -Field Technician-Other Home Appliances
- X९: Health Care-Home Health Aide
- ९५: Power-Consumer Energy Meter Technician
- ९७: Apparels-Sewing Machine Operator

९८: Plumber-General - Physical Educatdion and Sports

१.४ अभियांत्रिकी चित्रकलेची मुलतत्वे, विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स विषयातील सर्कीट डायग्राम तसेच संगणकाची मुलभूत तत्वे विद्यार्थ्यांना शिकविण्यात येतात.

१.५ इ. १०वी उत्तीर्ण उमेदवारांना तंत्र निकेतन प्रवेशासाठी १५% जागा राखीव आहेत. इ. ११ वी व्यावसायिक प्रवेशासाठी ४०% जागा राखीव आहेत.

**२. + २ स्तरावरील द्विलक्षी अभ्यासक्रम:**

२.१ डॉ. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार +२ स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड देऊन अधिकाधिक विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण द्यावे व रोजगार/स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करावे, जेणेकरुन महाविद्यालयीन शिक्षणाकडे जाणारा लोंढा थांबवावा या उद्देशाने राज्यात शैक्षणिक वर्ष १९७८-७९ पासून शासन निर्णय क्रमांक Education & Youth Service Department Resolution No.VOC/XXXVIII, Dt. ९th August, १९७८ अन्वये "द्विलक्षी अभ्यासक्रम" सुरु करण्यात आले आहेत. इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगार करावा व ते शक्य नसल्यास पुढील शिक्षण सुरु ठेवावे असा दुहेरी हेतू या योजनेमध्ये आहे म्हणून या योजनेस द्विलक्षी अभ्यासक्रम असे संबोधण्यात येते.

२.२ तांत्रिक, वाणिज्य, कृषी व मत्स्य अशा चार गटांमधून १३ द्विलक्षी अभ्यासक्रम सन २०१५-२०१६ पासून कार्यरत करण्यात आलेले आहेत.

२.३ इ. ११ वी व १२ वी मध्ये आवश्यक ६ विषयांपैकी एक भाषा व विज्ञान शाखेतील एका विषयात सूट देऊन त्या ऐवजी ३३% व्याप्ती असलेला २०० गुणांचा एक व्यवसाय अभ्यासक्रम शिकविण्यात येतो.

२.४ इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित अभ्यासक्रमात "व्होकेशनल टेक्निशियन" म्हणून १ वर्षाची शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी असून प्रशिक्षण काळात प्रति माह विहीत दराने विद्यावेतन अनुज्ञेय आहे.

२.५ इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या ठराविक प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना थेट प्रविष्ठ होण्याची मुभा आहे.

**३. +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम:**

३.१ डॉ. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने इ.११ वी व इ. १२ वी च्या स्तरावर व्यवसाय शिक्षणाची जोड द्यावी व जास्त विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन रोजगार व स्वयंरोजगार करण्यास प्रवृत्त करावे व महाविद्यालयीन शिक्षणाकडे जाणारा लोंढा थांबवावा या हेतूने ७०% व्याप्ती असेलेले व्यवसाय अभ्यासक्रम राज्यात सन १९८८-८९ पासून शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-१०८८/५१५१८/(७०३)/तांशि-२ ड, दिनांक २८.१०.१९८८ अन्वये सुरु करण्यात आलेले आहेत. या व्यवसाय अभ्यासक्रमांमध्ये ७०% प्रात्यक्षिकांचा व उर्वरित ३०% अभ्यासक्रमात दोन भाषा विषय व एक पायाभूत अभ्यासक्रम (जनरल फाऊंडेशन कोर्स) यांचा समावेश आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून हे व्यवसाय अभ्यासक्रम सुधारीत करण्यात आलेले आहेत.

३.२ तांत्रिक, वाणिज्य, कृषी, मत्स्य, अर्धवैद्यकीय व गृहशास्त्र अशा ६ गटांमधून सुधारीत २० व्यवसाय अभ्यासक्रम सन २०१५-२०१६ पासून सुरु करण्यात आलेले आहेत.

३.३ इ.१२ वी ची अंतिम परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येते. प्रशिक्षण कालावधीत कारखान्यात/उद्योगात प्रत्यक्ष कामाच्या जागी ऑन द जॉब ट्रेनिंगची सोय असते.

३.४ इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ अंतर्गत निर्देशित व्यवसायात "व्होकेशनल टेक्निशियन" म्हणून बोट (BOAT) मार्फत १ वर्षाची शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी असून प्रशिक्षण काळात प्रतिमहा विहीत दराने विद्यावेतन अनुज्ञेय आहे .पदविकेच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेशासाठी २% जागा आरक्षित आहे.

३.५ काही अभ्यासक्रमांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांशी समकक्षता देण्यात आलेली आहे तसेच D.Ed. प्रवेशास पात्र आहे.

३.६ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक व्हिओसी-२०१६/प्र.क्र.१७९/(१)/कौशल्य-२, दिनांक ४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रापासून शासकीय संस्थामधील +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय (HSC Vocational) अभ्यासक्रमाचे सर्व प्रवेश बंद करण्यात येत आहे.

## ४. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवयाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (MSBSVET)

महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाची स्थापना १९८६ मध्ये झाली व सन २०२१ मध्ये मंडळाचे नामांतत्रण महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळात झाले. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील सहसंचालक दर्जाचे अधिकारी यांना मंडळाचे अध्यक्ष म्हणुन नेमण्यात येते.

राज्यात मध्यम व मोठया औद्योगिक आस्थापनांची तसेच लघुउद्योगांची वाढ झाल्यामुळे कुशल कामगारांची गरज निर्माण झालेली आहे, त्याचबरोबर स्वयंरोजगाराच्या संधीसुध्दा उपलब्ध झालेल्या आहेत. त्या करिता विविध क्षेत्रात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे, हा महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचा प्रमुख उद्देश आहे.

शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तसेच प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्ययुक्त करुन रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यांत येतात. उपरोक्त अभ्यासक्रमांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानानुसार बदल होत आहेत. तसेच औद्योगिक व सेवाक्षेत्रामध्ये असलेली तांत्रिक मनुष्यबळाची मागणी पूर्ण करण्यासाठी सदर योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या अभ्यासक्रमांची व्याप्ती वाढत आहे. मंडळाच्या बऱ्याच अभ्यासक्रमांना शिकाऊ उमेदवारी योजना लागू असल्याने उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना त्याचा लाभ घेता येतो.

औद्योगिक आस्थापनांच्या गरजेप्रमाणे तसेच नविन तंत्रज्ञानावर आधारीत नव नविन अभ्यासक्रम मंडळामार्फत तयार करण्यात येत असतात. मंडळाला असणाऱ्या स्वायत्तेमुळे त्यांचे सर्व अभ्यासक्रम तात्काळ अद्यावत करण्यात येतात. सद्य:स्थितीत राज्यातील २५ शासकीय तंत्र माध्यमिक शाळा / केंद्रांमधून व १२३८ खाजगी विनाअनुदानित संस्थामधुन ६ महिने ते २ वर्षे कालावधीचे ३१५ विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यांत येत आहेत. सद्य:स्थितीत मंडळाच्या अभ्यासक्रमांची प्रशिक्षण क्षमता ६६,३८५ आहे.



**१८८० साली स्थापन एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, मुंबई या भारतील पहिल्या तांत्रिक विद्यालयाची एतिहासीक वास्तू**

**संदर्भ:**

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: आयटीआय-२०१२/प्र.क्र.९७/व्यशि-३, दि.१४.०६.२०१२
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दि.१४.०५.२०१५
३. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक: बैठक-३४१५/प्र.क्र.२४८/व्यशि-३, दि.०५.११.२०१५
४. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक: पीपीपी-२०१८/प्र.क्र.८९/१८/व्यशि-५, दि.०६.१०.२०१८
५. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमाकं: समिती-२०२०/प्र.क्र.१२८/व्यशि-३, दि.१६.०७.२०२०
६. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमाकं: समिती-२०२०/प्र.क्र.१२८/व्यशि-३, दि.२९.०६.२०२१
७. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५
८. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.०२.०४.२०१८
९. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: औप्रशि-२०१८/प्र.क्र.११०/एस.डी.२, दि.२७.०९.२०१८
१०. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दि. ०७.१२.२०१८
११. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२.०२.२०१९
१२. THE RIGHTS OF PERSONS WITH DISABILITIES ACT, २०१६
१३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२२/विशि-३, दि.०९.०७.२०१९
